02 AUG 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उलगडले अवकाशाचे अंतरंग

## 'सकाळ'च्या वर्धापन दिनानिमित्त प्रदर्शनाचे आयोजन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १ : अवकाशाचे अंतरंग अनुभवताना अनेकांचे आज येथे भान हरपले. आकाशगंगा, सूर्याचा जीवन प्रवास, चांद्रयान मोहीम-३ व भारतीय अवकाश संशोधन केंद्राची वाटचाल प्रदर्शनातून येथे उलगडली गेली आणि अनोख्या विश्वाची रुपरेषा कशी असू शकेल, याच्या विचारात उपस्थितांची मने रममाण झाली. निमित्त होते 'सकाळ'च्या ४४ व्या वर्धापन दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रातर्फे आयोजित 'अवकाश : चांद्रयान मोहीम - ३' प्रदर्शनाचे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहातील नटश्रेष्ठ बाबूराव पेंढारकर कलादालनात त्याचे आयोजन केले आहे.

'अवकाश संशोधनात नव्या पिढीने जोमाने काम करावे,' असे सांगत डॉ. शिर्के म्हणाले, 'ज्येष्ठ अवकाश शास्त्रज्ञ डॉ. आर. व्ही. भोसले यांच्या माध्यमातून विद्यापीठात अवकाश संशोधनास सुरुवात झाली. त्यांच्या अथक प्रयत्नाने अवकाश संशोधन केंद्राची स्थापना झाली आणि विद्यार्थ्यांनी अवकाशासंबंधीचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. अवकाश हा कुतूहलाचा तसाच सखोल विषय असून, डॉ. भोसले यांच्यानंतर डॉ. ए. के. शर्मा, डॉ. राजीव व्हटकर यांच्या माध्यमातून तो आजही सुरू आहे. पन्हाळा येथे अवकाश संशोधन केंद्र उभारण्यात आले आहे.'

ते पुढे म्हणाले, 'चांद्रयान मोहीम - ३'च्या माध्यमातून देश अवकाश क्षेत्रात काय करू शकतो, याची प्रचिती आली आहे. यापुढे संशोधक विद्यार्थ्यांकडून संशोधनाच्या अपेक्षा वाढल्या आहेत. त्यांनी या विषयात सखोल संशोधन करून देशाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी पुढाकार घ्यावा.'

यावेळी सकाळ माध्यम समूहाचे सल्लागार संपादक श्रीराम पवार यांच्या हस्ते डॉ. शिर्के, तर 'सकाळ'चे सरव्यवस्थापक (दक्षिण महाराष्ट्र) यतीश शहा यांच्या हस्ते प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व अवकाश संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांचा सन्मानचिन्ह व रोप देऊन सत्कार केला.

त्यानंतर डॉ. शिर्के, डॉ. पाटील व डॉ. शिंदे यांनी प्रदर्शनाची पाहणी करत चांद्रयान मोहीम तीनची माहिती घेतली. तसेच भारतीय अवकाश संशोधन केंद्राच्या प्रवासाची छायाचित्रे पाहिली.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे सचिव जयेश ओसवाल यांच्यासह अवकाश संशोधन केंद्राचे विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. भूषण करंदीकर यांनी सूत्रसंचालन केले. श्री. शहा यांनी आभार मानले.



कोल्हापूर : 'सकाळ'च्या ४४ व्या वर्धापनदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्रातर्फे आयोजित 'अवकाश : चांद्रयान मोहीम ३' प्रदर्शनाचे दीप प्रज्वलनाने उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डावीकडून जयेश ओसवाल, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सकाळ माध्यम समूहाचे सल्लागार संपादक श्रीराम पवार, सरव्यवस्थापक (दक्षिण महाराष्ट्र) यतीश शहा, डॉ. राजीव व्हटकर, ललित गांधी.

( बी.डी.चेचर : सकाळ छायाचित्रसेवा )

### प्रदर्शन आज-उद्या राहणार खुले

दरम्यान, प्रदर्शन उद्या (ता. २) व शनिवारी (ता. ३) सकाळी दहा ते सायंकाळी सहा या वेळेत खुले राहणार आहे. शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थिनी-विद्यार्थ्यांसह महिला, नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

02 AUG 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णा भाऊ साठे मूलगामी परिवर्तनासाठी झटले

## डॉ. आनंद मेणसे : विद्यापीठातील मराठी अधिविभागात व्याख्यान

कोल्हापूर, ता. १ : ''मूलगामी सामाजिक परिवर्तनासाठी झटणारे अण्णाभाऊ साठे हे महान कॉम्रेड होते,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. आनंद मेणसे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनातर्फे अण्णाभाऊ यांच्या जयंतीनिमित्त 'अण्णाभाऊ साठे: जीवन व कार्य' या विषयावर डॉ. मेणसे यांचे विशेष व्याख्यान झाले. मराठी अधिविभागात कार्यक्रम झाला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. मेणसे म्हणाले, ''अण्णाभाऊ साठे यांनी डांगे यांनी पुकारलेला गिरणी संप



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना डॉ. आनंद मेणसे.

फोडण्याचे भांडवलदारी प्रयत्न लहानपणीच जवळून पाहिल्यामुळे या घटनेचा त्यांच्या मनावर प्रदीर्घ परिणाम झाला. त्यातून कामगारांच्या दुःखांविषयी ते सजग झाले. मॅक्झिम गॉर्की वाचल्यानंतर या दुःखांना वाचा फोडण्याचे लेखनासारखे प्रभावी शस्त्र त्यांनी हाती धरले. सत्यशोधक आणि आंबेडकरी चळवळींच्या घुसळणीच्या त्या कालखंडात संवेदनशील अण्णांनी जाणीवपूर्वक लाल बावटा हाती घेतला आणि अखेरपर्यंत तो अभिमानाने खांद्यावर मिरविला. चळवळीचा आशय आणि तत्त्वज्ञान तळागाळातील लोकांपर्यंत नेण्याचे आव्हान त्यांनी पेलले.''

मान्यवरांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले. डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. जगन कराडे, डॉ. मंजुश्री पवार, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. अवनीश पाटील, विश्वास सुतार, डॉ. मेघा पानसरे, डॉ. के.एम. गरडकर उपस्थित होते.

> "अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य बहुआयामी स्वरुपाचे आहे. केवळ मराठी विषयाच्याच नव्हे, तर सर्वच विषयाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे साहित्य वाचायला हवे. अण्णाभाऊ अत्यंत संघर्षातून शिकले, समाजाला शिकविले आणि रशियन सरकारकडून सन्मान मिळविण्यापर्यंत त्यांनी मजल घेतली, ही त्यांची कामगिरी प्रेरणादायी आहे.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 AUG 2024
पुण्यनगरी

# परिवर्तनासाठी झटणारे अण्णा भाऊ महान कॉम्रेड : मेणसे

कोल्हापूर : प्रतिनिधी

मूलगामी सामाजिक परिवर्तनासाठी झटणारे अण्णा भाऊ साठे हे महान कॉम्रेड होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. आनंद मेणसे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे अण्णा भाऊ यांच्या जयंतीनिमित्त 'अण्णाभाऊ साठे : जीवन व कार्य' या विषयावर त्यांचे विशेष व्याख्यानात ते बोलत होते. मराठी अधिविभागात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

डॉ. मेणसे म्हणाले, अण्णा भाऊ साठे यांनी कॉ. डांगे यांनी पुकारलेला गिरणी संप फोडण्याचे भांडवलदारी प्रयत्न लहानपणीच खूप जवळून पाहिल्यामुळे या घटनेचा त्यांच्या मनावर प्रदीर्घ परिणाम झाला. त्यातून कामगारांच्या दुःखाविषयी ते सजग झाले. सत्यशोधक आणि आंबेडकरी चळवळींच्या घुसळणीच्या त्या कालखंडात संवेदनशील अण्णांनी जाणीवपूर्वक लाल बावटा हाती घेतला आणि अखेरपर्यंत तो अभिमानाने खांद्यावर मिरवला.

दरम्यान, मान्यवरांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. जगन कराडे, डॉ. मंजुश्री पवार, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. अवनीश पाटील, विश्वास सुतार, डॉ. मेघा पानसरे, डॉ. के.एम. गरडकर आदी उपस्थित होते.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 AUG 2024
लोकमत

# परिवर्तनासाठी झटणारे 'अण्णाभाऊ' महान कॉम्रेड

## आनंद मेणसे : विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मूलगामी सामाजिक



परिवर्तनासाठी झटणारे अण्णाभाऊ साठे हे महान कॉम्रेड होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. आनंद मेणसे यांनी गुरुवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनाच्या वतीने अण्णाभाऊ यांच्या जयंतीनिमित्त 'अण्णाभाऊ साठे : जीवन व कार्य' या विषयावर डॉ. मेणसे यांचे व्याख्यान झाले. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. डॉ. मेणसे म्हणाले, अण्णाभाऊ साठे यांनी कॉ. डांगे यांनी पुकारलेला गिरणी संप फोडण्याचे भांडवलदारी प्रयत्न लहानपणीच पाहिल्यामुळे या घटनेचा त्यांच्या मनावर प्रदीर्घ परिणाम झाला. मॅक्झिम गॉर्की वाचल्यानंतर दुःखांना वाचा फोडण्याचे लेखनासारखे प्रभावी शस्त्र त्यांनी हाती धरले. संवेदनशील अण्णांनी जाणीवपूर्वक लाल बावटा हाती घेतला.

डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले, तर सुखदेव एकल यांनी आभार मानले. डॉ. प्रभंजन माने, अक्षय सरवदे, जगन कराडे, मंजुश्री पवार, कैलास सोनवणे, अवनीश पाटील, विश्वास सुतार, मेघा पानसरे, के.एम. गरडकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 AUG 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठ

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, अण्णा भाऊ साठे अध्यासनाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. सुखदेव एकल, डॉ. प्रभंजन माने, डॉ. मच्छिंद्र गोफणे, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, सहायक कुलसचिव सुरेश बंडगर, रवि लोंढे, सुस्मिता खुटाळे, अमोल देशमुख, निलेश सुर्यवंशी, करूणा उकीरडे, अनुराधा साटम यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 AUG 2024
लोकमत

# विद्यापीठात अण्णा भाऊ साठे जयंती

कोल्हापूर : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती गुरुवारी शिवाजी विद्यापीठात उत्साहत साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, अण्णा भाऊ साठे अध्यासनाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. धनंजय सुतार, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. सुखदेव एकल, डॉ. प्रभंजन माने, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. प्रमोद पांडव, सुरेश बंडगर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 AUG 2024
सकाळ

# बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांना विद्यापीठात अभिवादन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रामध्ये खर्डेकर यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव, वित्त व लेखाधिकारी एस. एस. पाटील, अधिष्ठाता डॉ. एस. एस महाजन, डॉ. नंदकुमार मोरे, रणधीर शिंदे, शरद बनसोडे, सचिनकुमार पाटील, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अधिविभाग डॉ. डी. बी. सुतार, बॅरिस्टर खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे प्रभारी संचालक, उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, सहायक ग्रंथपाल डॉ. एस. व्ही. थोरात उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 AUG 2024
लोकमत

# विद्यापीठात बाळासाहेब खर्डेकर जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रात बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांची १२२वी जयंती गुरुवारी साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, सुहासिनी पाटील, श्रीकृष्ण महाजन, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. शरद बनसोडे, डॉ. सचिनकुमार पाटील, डी. बी. सुतार, डॉ. पी. बी. बिलावर डॉ. एस. व्ही. थोरात उपस्थित होते. याप्रसंगी बाळासाहेब खर्डेकर यांच्या जीवन कार्याचा आढावा मांडला

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 AUG 2024
सकाळ

# विद्यापीठाच्या परीक्षा सुरू

**कोल्हापूर :** अतिवृष्टीमुळे शिवाजी विद्यापीठाने स्थगित केलेल्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा आजपासून पूर्ववत सुरू करण्यात आल्या. त्याच्या पहिल्या दिवशी बॅचलर ऑफ फार्मसी, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ फार्मसी, बॅचलर ऑफ लॉज (स्पेशल), बॅचलर ऑफ लॉज (पाच वर्षे), बॅचलर ऑफ आर्किटेक्चर अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयामध्ये सुरळीतपणे पार पडल्या आहेत. या परीक्षांसाठी ३ हजार ५३३ विद्यार्थ्यांपैकी १२७ विद्यार्थी अनुपस्थित होते. डीफार्मा भाग एक आणि दोन या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर परीक्षा मंडळाने ७३३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 AUG 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत उन्हाळी परीक्षा सुरू आहेत. गुरूवारी बॅचलर ऑफ फार्मसी, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ फार्मसी, बॅचलर ऑफ लॉ (स्पेशल), बॅचलर ऑफ लॉ (फाईव्ह इयर), बॅचलर ऑफ आर्किटेक्चर या सहा विषयांच्या परीक्षा झाली. या परीक्षेला ३ हजार ५३३ पैकी ३ हजार ४०६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर १२७ विद्यार्थी अनुपस्थित होते. या परीक्षेत भरारी पथकाला एकही गैरप्रकार आढळलेला नाही. आत्तापर्यंत ७३३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 AUG 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या ७३३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२४ मधील उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षा सध्या सुरू आहेत. गेल्या आठवड्यात पूर परिस्थितीमुळे नियोजित परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. या परीक्षा गुरुवारपासून सुरळीत सुरू झाल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभागाच्या वतीने देण्यात आली. तसेच आजअखेर ७३३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

अतिवृष्टीमुळे अनेक मार्ग बंद झाल्याने विद्यापीठ प्रशासनाने पूरकाळातील परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घेतला होता. पूरस्थिती नियंत्रणात आल्यामुळे १ ऑगस्टला

- **पूरपरिस्थितीतील स्थगित परीक्षा सुरळीत सुरू**

स्थगित परीक्षांसह नियोजित परीक्षा सुरळीत पार पडल्या. आज गुरुवारी फार्मसी, टेक्नॉलॉजी, लॉ या अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तर परीक्षा घेण्यात आल्या. या परीक्षांसाठी ३,५३३ विद्यार्थ्यांपैकी १२७ विद्यार्थी अनुपस्थित होते. परीक्षांमधील गैरप्रकारांवर अंकुश ठेवण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने भरारी पथकांनी नियुक्ती केली आहे. डी. फार्मसी पार्ट-१, डी. फार्मसी पार्ट-२ अभ्यासक्रमांचे निकाल आज गुरुवारी जाहीर करण्यात आले. तसेच आजअखेर झालेल्या ७३३ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 AUG 2024
पुढारी

# विद्यापीठ अविष्कार संशोधन स्पर्धा स्थगित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा तिन्ही जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने पूर आला आहे. पुराचे पाणी कमी झाले असले तरी काही भागात पावसाचा जोर कायम आहे. त्यामुळे विद्यापीठ अंतर्गत कोल्हापुरातील न्यू कॉलेजमध्ये २ ऑगस्ट रोजी व साताऱ्यातील सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालयात ३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा व कार्यशाळा स्थगित करण्यात आल्या आहेत. याची महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास केंद्राच्या वतीने परिपत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

02 AUG 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# अंतराळामध्ये वाढतोय कचरा

आतापर्यंत विविध कारणांसाठी अंतराळामध्ये उपग्रह सोडले आहेत. या उपग्रहांचे आयुष्य दोनपासून पंचवीस वर्षांपर्यंत असते. परग्रहांचा अभ्यास करण्याच्या हेतूने पाठवलेले उपग्रह पृथ्वीच्या कक्षेबाहेर कचरा करतात, तर पृथ्वीच्या कक्षेतही कचरा वाढतो आहे. आयुष्य संपल्यानंतर उपग्रह तसेच फिरत असतात. यातून अंतराळातील कचरा वाढत आहे. कृत्रिम उपग्रह, त्यांचे अवशेष, प्रक्षेपक किंवा रॉकेटचे भाग यामुळे अनेकदा अपघाताची परिस्थिती उद्‌भवते.



डॉ. व्ही. एन. शिंदे

दुसऱ्या महायुद्धापर्यंत निव्वळ कल्पनेतील अंतराळ, अवकाश आपल्या कवेत घेण्याची स्वप्ने मानवाला पडू लागली. या अंतराळाचा वेध घेण्याचा प्रयत्न अनेक देशांनी सुरू केला. उपग्रहांचे महत्त्व हवामान अंदाज, सुरक्षा, दळणवळण अशा अनेक कारणांसाठी असल्याचे मानवाच्या लक्षात आले. अमेरिका आणि रशिया या देशांनी अंतराळात उपग्रह पाठवण्यासाठी मोठ्या प्रमाणात संशोधन प्रकल्प सुरू केले. या राष्ट्रांनी उपग्रह अंतराळात सोडून आपले सामर्थ्य दाखवण्यास सुरुवात केली. जी राष्ट्रे स्वतः उपग्रह अवकाशात पाठवू शकत नव्हती, अशी राष्ट्रेही इतर राष्ट्रांमार्फत असे उपग्रह अवकाशात पाठवू लागली. त्यानंतर मानवाला चंद्रावर यान आणि मानव पाठवण्याचे स्वप्न पडू लागले. त्यासाठीही अमेरिका आणि रशिया या दोन देशांत स्पर्धा सुरू झाली. भारतानेही आपली चांद्र मोहीम राबविण्यास सुरुवात केली. मानवाला आपल्या वास्तव्यासाठी नवी जागा हवी आहे. त्यासाठी मंगळ आणि इतर ग्रहांवर संशोधन सुरू केले. इलान मस्क यांनी तर रॉकेट पर्यटनाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. हजारो उपग्रह अवकाशात पाठवले जाऊ लागले. त्याचा परिणाम म्हणजे अंतराळ उपग्रहांनी भरले जाऊ लागले.

परग्रहांच्या अभ्यासासाठी पाठवले जाणारे उपग्रह पृथ्वीच्या कक्षेबाहेर कचरा करतात. चंद्र आणि मंगळावरही कचरा होत आहे; मात्र त्यापेक्षा घातक ठरत आहे तो पृथ्वीच्या कक्षेत असणारा कचरा. विविध राष्ट्रांनी अंतराळात उपग्रह सोडले आहेत. हे उपग्रह आयुष्य संपल्यानंतर आपल्या कक्षांमधून तसेच फिरत असतात आणि हीच खरी समस्या झाली आहे. पृथ्वीवरील कचरा ही जेवढी भीषण समस्या आहे, तेवढीच गंभीर समस्या अंतराळातील कचरा बनत आहे. हा कचरा कृत्रिम उपग्रह, त्यांचे अवशेष, उपग्रहाला विशिष्ट उंचीवर कक्षेत सोडणाऱ्या प्रक्षेपक किंवा रॉकेटचे भाग अंतराळात फिरत राहत असल्याने तयार होत आहे.

## निष्क्रिय उपग्रह परत आणावेत

खरं तर जागतिक पातळीवर मान्य केलेल्या नियमानुसार, ज्या राष्ट्राने उपग्रह अंतराळात सोडलेला आहे त्या राष्ट्राची ही जबाबदारी आहे की, खालच्या कक्षेत सोडलेल्या उपग्रहांना त्यांनी पुन्हा पृथ्वीवर आणावे. मात्र या नियमानुसार ४० ते ६० टक्के इतकेच उपग्रह पृथ्वीवर परत आणले जातात. आकाराने छोटे असणारे उपग्रह पृथ्वीच्या कक्षेत आणले जातात, कारण ते पृथ्वीकडे वेगाने येत असताना पेट घेतात आणि हवेतच जळून जातात. उर्वरित सर्व उपग्रह पृथ्वीभोवती निश्चित केलेल्या कक्षेत फिरत राहतात. या उपग्रहांची अनेकदा परस्परांशी धडकही होते. त्यात ते फुटतात आणि त्यांचे असंख्य तुकडे अंतराळात फेकले जातात. अशा अंतराळात फिरणाऱ्या दहा सेंटिमीटरपेक्षा जास्त लांबी असणाऱ्या तुकड्यांची आणि यानांची संख्या दहा लाखांपेक्षा जास्त आहे. शून्य ते नऊ सेंटिमीटर आकाराच्या तुकड्यांची संख्या १३ लाखांपेक्षा जास्त आहे. यातील १६३ तुकडे भारताचे आहेत. २०२२ च्या आकडेवारीनुसार, अंतराळात निष्क्रिय फिरणाऱ्या उपग्रहांची संख्या ८२६१ इतकी आहे. तसेच कार्यरत उपग्रहांची संख्या ४८५२ आहे. हे उपग्रह आणि इतर कचरा वेगाने अंतराळात फिरत असतो. २००९ मध्ये अमेरिका आणि रशियाच्या उपग्रहांची अवकाशात अशीच धडक झाली. त्यातून उपग्रह फुटले आणि अंतराळामध्ये त्यांचे तुकडे विखुरले गेले. अशा पद्धतीने अंतराळातील कचरा दिवसेंदिवस वाढत आहे. पृथ्वीच्या कक्षेत असणारा कचरा पृथ्वीच्या भूपृष्ठापासून १२५० किलोमीटर अंतरापर्यंत फिरत आहे.

## कचरा हटविण्यासाठी मोहीम

मानवाने अवकाशामध्ये आपले स्थानक बनवले आहे. तेथे राहणे, फिरणे, व्यायाम करणे यांसह सर्व सोयी उपलब्ध आहेत. तेथे अंतराळवीर जातात, काही दिवस राहतात, प्रयोग करतात आणि परत पृथ्वीवर येतात. हे आंतरराष्ट्रीय स्थानक जगातील अमेरिका, रशियासह सोळा देशांनी एकत्र येऊन उभे केले आहे. याच अंतराळस्थानकावर काही दिवस राहून प्रयोग करण्यासाठी भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स गेल्या आहेत. त्यांचे यान अवकाश स्थानकापर्यंत पोहोचताना अंतराळातील कचऱ्यापैकी एक तुकडा स्टारलाईनरला येऊन धडकण्याची शक्यता निर्माण झाली; मात्र थोडक्यात हा अपघात वाचला. अंतराळातील कचरा ही भीषण समस्या बनत असताना ब्रिटनने सामंजस्याची भूमिका घेतली आहे. त्यातून फ्रान्ससह काही युरोपीय देश सहमत झाले. २०२५ मध्ये युरोपियन युनियन अंतराळातील कचरा कमी करण्यासाठी विशेष मोहीम राबवणार आहे. यातून अंतराळ स्वच्छ करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. यासाठीचा प्रचंड खर्च करण्याची तयारी युरोपियन युनियनने केली आहे. खरं तर, संपूर्ण जगाने या मोहिमेत सहभागी होण्याची गरज आहे.

**अमेरिका, रशिया आणि चीन या तीन राष्ट्रांकडून सर्वांत जास्त अंतराळ मोहिमा आखण्यात येतात. त्यांच्याकडून अंतराळात सर्वांत जास्त कचरा करण्यात येतो. तो कमी करण्याची जबाबदारीही त्यांचीच आहे. विविध परिषदा आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकांमध्ये या राष्ट्रांचे अंतराळातील कचरा कमी करण्यावर एकमत होते. प्रत्यक्ष कृती करण्याच्या वेळी मात्र तीन राष्ट्रांची तोंडे तीन दिशांना फिरतात. त्यामुळे कृतिशून्य चर्चा होत राहतात आणि अंतराळातील कचरा वाढतच राहतो. चंद्र आणि मंगळावरदेखील कचरा होत आहे. अमेरिकेला भारताच्या चांद्र मोहिमेतील काही भाग चंद्रावर सापडले आहेत.**

## स्कायलॅबचा धडा

'नासा'ने स्कायलॅब नावाचे अंतराळस्थानक बनवले होते. ते १२ ऑगस्ट १९७१ रोजी कोसळणार असल्याचे 'नासा'कडून सांगण्यात आले होते; त्या वेळी भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अंतराळातील ही प्रयोगशाळा नऊमजली इमारतीच्या उंचीची होती. या प्रयोगशाळेचे वजन ७८ टन होते. ही प्रयोगशाळा १९७३ मध्ये उभारली होती. १९७८ मध्ये आलेल्या सौरवादळाने या प्रयोगशाळेचे नुकसान केले आणि तिच्यात बिघाड झाला व तिचा 'नासा'शी असलेला संपर्क तुटला. अर्थात, त्यामुळे या प्रयोगशाळेचे काय होणार, याचा नेमका अंदाज कोणालाच नव्हता. अखेर संशोधकांच्या लक्षात आले की, ही प्रयोगशाळा पृथ्वीवर येऊन आदळणार आहे. त्यानंतर स्कायलॅब कोठे पडणार याच्या चर्चा सुरू झाल्या. लोकांच्या मनामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्याचा फायदाही काहींनी उठविला. १२ ऑगस्ट रोजी स्कायलॅब पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करणार होते. पोलिसांनी संपूर्ण भारतभर हाय अलर्ट जारी केला होता. अगदी अखेरच्या क्षणी 'नासा'ने जाहीर केले की, स्कायलॅब भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या दरम्यान हिंदी महासागरात कोसळेल. त्याप्रमाणेच ते कोसळले. स्कायलॅबचे काही तुकडे ऑस्ट्रेलियाच्या पश्चिम भागामध्ये पडले; मात्र त्या भागात लोकवस्ती नसल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टर यांनी ऑस्ट्रेलियाची माफी मागितली. अमेरिकेवर याबाबत एका संस्थेने ४०० डॉलरचा दावा दाखल केला; मात्र अमेरिकेने शेवटपर्यंत ही रक्कम काही ऑस्ट्रेलियाला दिली नाही.

## सर्वांनीच घ्यावी काळजी

त्यानंतर फार वेगाने तंत्रज्ञान बदलले आहे. प्रक्षेपक किंवा रॉकेट तंत्रज्ञान खूप विकसित झाले आहे. अवकाशातील एखाद्या लक्ष्याचा अचूक वेध घेणारी प्रणाली विकसित झाली आहे. त्यामुळे एखाद्या तुकड्याने पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश केला तरी त्याचे छोटे तुकडे करून जीवित आणि वित्त हानी टाळता येऊ शकते. चीनचे एक रॉकेट अंतराळात भरकटलेले आहे. नियंत्रणाबाहेर गेलेले हे रॉकेट कधी, कोठे पडणार, हे नेमके कोणालाच सांगता येत नाही. मात्र, आजच्या प्रगत तंत्रज्ञानामुळे १९७१ ला अनुभवलेला थरार पुन्हा निर्माण होणार नाही. आज अवकाशातून येणारा धूमकेतू असेल, लघुग्रह असेल, त्याला थोपवण्याची क्षमता मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने गाठलेली आहे. अंतराळातील कचरा अशा लक्ष्यभेदाच्या वेळी मध्ये येण्याची शक्यता असते; मात्र विकसित करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीमुळे गणिते मांडून योग्य वेळ साधण्याची क्षमता आजच्या वैज्ञानिकांमध्ये आहे. हे जरी खरे असले तरी अंतराळ संशोधन करताना अंतराळातील कचरा वाढणार नाही, उलट तो कमी कसा होईल, याची काळजी सर्वच राष्ट्रांनी घेण्याची गरज निर्माण झाली आहे. युरोपियन युनियनचा प्रकल्प लवकरच सुरू होवो आणि त्यांच्या प्रयत्नातून अंतराळातील कचरा नष्ट व्हावा, हीच अपेक्षा!

## चीनचा वेध आणि कचऱ्यात भर

२००७ मध्ये चीनने आपले एक रॉकेट हवामान अंदाज बांधण्यासाठी नोंदी घेण्यासाठी सोडलेल्या मात्र निष्क्रिय झालेल्या उपग्रहावर सोडले. आंतरखंडीय प्रक्षेपकाच्या चाचणीमागे आपली संरक्षणसिद्धता जगाला दाखवण्याचा हेतू होता. या उपग्रहाचा नेमका वेध त्या रॉकेटने घेतला आणि रॉकेटने त्या उपग्रहाचे तुकडे केले. या एका घटनेमध्ये त्या उपग्रहाचे ३००० तुकडे झाले आणि ते अंतराळात विखुरले गेले. हा कचरा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

vilasshindevs44@gmail.com
(लेखक शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव आहेत.)

02 AUG 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




भवताल

डॉ. रसिया पडळकर

निसर्ग, लहान मुले, माणसांना व्यवस्थेकडून ओरबाडायला सुरुवात होते, तिथे तुकारामाची गाथा तरंग निर्माण करते. रिचेल कार्सनने लिहिलेले 'सायलेंट स्प्रिंग... अर्थात 'मूक वसंत' हा असाच एक तरंग...!

# जेव्हा मूक वसंत फुलतो...



आम्हा घरी धन' शब्दांची रत्ने । शब्दांची शस्त्रे यत्न करू ।

तुकोबांपासून सुरू असलेला शब्दशस्त्रांचा हा विद्रोह जगाच्या पाठीवर कुठे ना कुठे कायमच सुरू असतो...

जिथे जिथे निसर्ग, स्त्रिया, लहान मुले, माणसांना व्यवस्थेकडून ओरबाडायला सुरुवात होते, तिथे-तिथे तुकारामाची गाथा तरंग निर्माण करते. अमेरिकेतील रिचेल कार्सनने लिहिलेले 'सायलेंट स्प्रिंग'... अर्थात 'मूक वसंत' हा असाच एक तरंग...!

रिचेल कार्सन या संशोधिकेने १९६२ मध्ये 'सायलेंट स्प्रिंग' हे पुस्तक प्रकाशित केले. दुसऱ्या महायुद्धामध्ये मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आलेल्या डीडीटी या कीटकनाशकाच्या परिणामांवर तिने संशोधन करायला सुरुवात केली आणि रासायनिक कीटकनाशकांचे भयावह असे परिणाम तिच्यासमोर आले. या संशोधनातून निर्माण झालेल्या अस्वस्थतेतून निर्माण झालेले हे पुस्तक. अर्थातच रसायने निर्माण करणाऱ्या कंपन्यांकडून या पुस्तकाला कडाडून विरोध झाला; पण अमेरिकेमधील जागरूक नागरिकांनी तितक्याच संवेदनशीलतेने आणि तरीही उत्स्फूर्तपणे या पुस्तकाची दखल घेतली. या पुस्तकामुळे निर्माण झालेल्या लोकचळवळीच्या दबावातून १९७० साली युनायटेड स्टेट्स एन्व्हायर्नमेंटल प्रोटेक्शन एजन्सीची निर्मिती झाली आणि डीडीटी या कीटकनाशकांवर संपूर्ण अमेरिकेत बंदीदेखील घालण्यात आली.

युद्धाच्या काळात अत्यंत वेगाने लावलेले वैज्ञानिक शोध त्यांच्या पुरेशा परिणामांची खात्री न पटवता वेगाने रोजच्या जगण्यात वापरायला सुरुवात झालेली होती. यातूनच एकापाठोपाठ एक पर्यावरणीय हानीच्या अनेक घटना जागतिक पातळीवर घडत होत्या. १९५२ साली झालेली लंडन येथील धुक्याची घटना आणि त्यात सुमारे ४००० लोकांचा झालेला मृत्यू, त्यानंतर १९५६ मध्ये जपानमध्ये झालेल्या मिथेल मर्क्युरीच्या गळतीमधून झालेली मीनामाटा आपत्ती, १९६६ मध्ये ब्रिटनमध्येच घडलेली कोळसा खाणीचा मलबा कोसळून ११६ शालेय मुले गाडली गेल्याची घटना, १९६९ मध्ये सॅन्टा बार्बरा येथे मोठ्या प्रमाणात झालेली समुद्रातील तेलाची गळती. त्यात मृत्युमुखी पडलेले हजारो पक्षी आणि या सगळ्या घटनांच्या पार्श्वभूमीवर प्रकाशित झालेले कार्सनचे 'मूकवसंत'. येऊ घालणारा एक असा वसंत ज्या वसंतात फुले फुलणारच नाहीत, पक्षी गाणी गाणारच नाहीत.

जागतिक पातळीवर घडणाऱ्या या घटनांनी युरोप हादरून गेला होता. मानवी हस्तक्षेपामुळे, मानवाकडून होणाऱ्या निसर्गाच्या अतोनात शोषणाचे निसर्गाच्या आणि परिणामी माणसाच्याच अस्तित्वावर होणारे परिणाम समोर येऊ लागले होते. निसर्गाला असे गृहीत धरून चालणार नाही. किमान एवढे तरी काही जाणकार मंडळींना जाणवू लागले होते. कार्सनच्या पुस्तकाने वैज्ञानिक समुदायामध्ये आणि जागरूक नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव तर निर्माण झालीच; पण याचे रूपांतर जागतिक नागरी समुदायाच्या दबावामध्ये होऊन केवळ १९७२ साली संयुक्त राष्ट्र संघाने पर्यावरणविषयक चर्चा करणारी पहिली वसुंधरा परिषद आयोजित केली. स्वीडनची राजधानी स्टोकहोम येथे ५ जून ते १४ जूनदरम्यान झालेल्या या परिषदेस भारताकडून इंदिरा गांधी उपस्थित होत्या आणि या ठिकाणी अत्यंत प्रभावी आणि संवेदनशील असे भाषण त्यांनी केले. यानंतर पुढे संयुक्त राष्ट्रसंघाने नियमितपणे पर्यावरणविषयक परिषद आयोजित करायला सुरुवात केली. एवढेच नाही तर पर्यावरणविषयक काम करण्यासाठी 'युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंट प्रोग्रॅम' (UNEP) या स्वतंत्र संस्थेची स्थापना केली. कार्सनने रंगवलेल्या मूक वसंतामुळे जगभरामध्ये पर्यावरण चळवळीच्या रोपट्याने जोम धरला. अर्थात अजूनही आपण शाश्वत विकासाच्या मार्गावर आहोत, असे म्हणता येणार नाही; पण मानवी विकासाचा वारू उधळताना निसर्ग आकलनाचा लगाम त्याला घालावा लागेल आणि टाचेखाली उद्याच्या पिकाचे अंकुर तर चिरडले जात नाहीत ना, याची काळजी घ्यावी लागेल. याचे किमान भान राज्यकर्ते, धोरणकर्ते आणि तुम्हा-आम्हाला आले तरी गाणाऱ्या वसंताची आस मनाशी बाळगता येईल.